वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालय
Tel. No.022 28860362 E-mail - ccfsgnp@mahaforest.gov.in / sgnpmumbai@gmail.com

## शासकिय भंगार साहित्याचा लिलाव

तमाम इच्छूक खरेदीदारांना कळविण्यात येते की, वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वन विभागातील यांचे कार्यालयामार्फत उद्यानामधील कृष्णगिरी वनपरीक्षेत्रात भंगार साहित्याचे ढिगारे (Lot) ठेवण्यात आलेले आहेत. तरी दि.०४/०१/२०२१ रोजी १२.०० वाजता आमच्या कार्यालयाच्या घडयाळाप्रमाणे भंगार साहित्याचा लिलाव विभागीय वन अधिकारी (वन्यजीव-१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांच्या समक्ष होणार आहे. तरी इच्छूक बोलीधारांनी लिलावास हजर राहून बोली करावी.

**लिलावाच्या मुख्य अटी / शर्ती**

१. जे मक्तेदार लिलावात भाग घेतील त्यांनी त्यांचा संपूर्ण पत्ता, वास्तव्याबाबतचा पुरावा यांची खात्री करणेसाठी निवडणुक ओळखपत्र, आधार कार्ड, रेशनकार्ड विद्युत बिल, दुरध्वनी बिल घरपट्टी इत्यादीपैकी एकांची साक्षांकीत प्रत हजर करावी, तरच त्यांना विक्री प्रक्रियेत भाग घेता येईल.
२. ज्या मक्तेदारांना लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी तारण रक्कम म्हणून Conservator of Forest & Director Sanjay Gandhi National Park Borivali या नावाचा रक्कम रुपये ५०००/- (पाच हजार रुपये मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) मक्तेदारांनी लिलावापूर्वी जमा करावा.
३. खरेदी दारांस नियमानुसार लिलाव रक्कमेवर (GST) कर भरावे लागतील.
४. लिलावाच्या इतर शर्ती या वन विभागाच्या http:/ sgnpmaharashtra.gov.in वेबपेजवर प्रसिध्द करण्यात येतील तसेच लिलावाच्या वेळीसुध्दा वाचुन दाखविण्यात येईल.
५. यशस्वी बोलीधारकास भंगार साहित्याची लिलावाची संपूर्ण रक्कम लिलाव मंजूर झाल्यानंतर धनाकर्षाव्दारे करासह पाच दिवसाच्याल आत भरावी लागेल.
६. कोणतेही कारण नमूद न करता लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार विभागीय वन अधिकारी (वन्यजीव-१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांना राहील त्याचा निर्णय सर्व खरेदीदारास बंधनकारक राहील.

ठिकाण :- बोरीवली
दिनांक :- २3/१२/२०२०

(जी. मल्लिकार्जुन)
वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

लिलावाच्या मुख्य अटी / शर्ती ..

१. या कार्यालयाने निश्चित केलेल्या विक्रीच्या किंमतीपेक्षा (Upset Price) सर्वात जास्त रक्कमेच्या बोलीधारकास यशस्वी बोलीधारक म्हणून घोषित करण्यात येईल.
२. निरुपयोगी साहित्य उचल / वाहतूक करताना ठेकेदाराच्या प्रतिनिधी अथवा कर्मचाऱ्यास दुखापत / मयत झाल्यास त्याबद्दल कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात येणार नाही. याबाबतची संपूर्ण जबाबदारी यशस्वी बोलीधारकाची राहील.
३. निरुपयोगी साहित्य जेथे आहे व जशी आहे अशा स्थीतीत यशस्वी बोलीधारकास सुपुर्द करण्यात येईल व त्यांची संपूर्ण उचल करण्याची जबाबदारी यशस्वी बोलीधारकाची राहील.
४. बोलीधारक हे कंपनी / फर्म / भागीदारी इत्यादी असल्यास त्यांनी फार्म संबंधीची कागदपत्राची सत्य प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच कंपनी / फर्म / भागीदारी इत्यादींच्या वतीने स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीस कंपनी / फर्म / भागीदारी ने स्वाक्षरी करण्याचे अधिकार (Power of Attorney) दिले असल्यास पत्र जोडणे आवश्यक आहे.
५. शासनाने ठरविलेल्या जाहिर लिलावा बाबत शर्ती व अटी बोलीधारकास बंधनकारक राहतील.
६. इच्छूक बोलीधारकांनी जाहिर लिलावात भाग घेण्यापूर्वी विक्रीस ठेवण्यात आलेल्या भंगार निरुपयोगी साहित्याची प्रत्यक्ष जागेवर तपासणी करुन स्वतःची खात्री करुनच लिलावात भाग घ्यावा. जाहिर लिलाव प्रक्रियेनंतर कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही. वरील बाबींची पडताळणी संबंधीत इच्छूक बोलीदारांनी करुन घेणे त्यांना बंधनकारक राहील.
७. इच्छूक खरेदीदार यांना सदरचे निर्लेखित स्क्रॅप निरुपयोगी साहित्यांची वाहतूक व विपणन, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव-१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० पर्यत (शासकिय सुट्टीचे दिवस वगळून) या वेळेत पाहता येतील.
८. इच्छूक बोलीदारांनी त्यांचे GST प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, PAN क्रमांक व आधार कार्ड, निवासाचा पूरावा, तसेच मोबाईल क्रमांक व तारण रक्कम म्हणून Conservator of Forest & Director Sanjay Gandhi National Park Borivali या नावाचा रक्कम रुपये ५०००/- (पाच हजार रुपये मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) मक्तेदारांनी स्वतःचे ओळखपत्र म्हणून आधार कार्ड इत्यादी पॅनकार्डची साक्षांकित प्रत सोबत जोडणे अनिवार्य राहील.
९. जाहिर लिलाव कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा पूर्णतः नाकारण्याचा अधिकार विभागीय वन अधिकारी (वन्यजीव-१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांनी राखून ठेवला आहे. सदर स्क्रॅप साहित्याचा विक्री संबधीच्या कोणत्याही अटी व शर्तीच्या निर्णयाबाबत वाद उपस्थित झाल्यास विभागीय वन अधिकारी (वन्यजीव-१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांनी दिलेले निर्णय अंतिम राहील व ते सर्व बोलीधारकाला बंधनकारक राहील.

ठिकाण :- बोरीवली
दिनांक :- २३/१२/२०२०

(जी. मल्लिकार्जुन)
वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली